सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर
# चपराक
■ पुणे ■ वर्ष : ५
■ अंक : १९
■ पाने : ४
■ मूल्य : ₹ ३
संपादक : घनश्याम पाटील
Website :www.chaprak.com
■ सोमवार, ०१ ते ०७ जून २०१५ ■ RNI No. MAHMAR/2011/35979 ■ पोस्टल नोंदणी क्र. PCW/159/2014-2016
Licensed to post without prepayment of postage no. **WPP - 14** Posted at Pune PSO on every Wednesday, date of publication 03/06/2015

KaMANT
कामंत मसाले
किंग ऑफ टेस्ट
एकदा वापरून पहाच!
व्हेज-नॉनव्हेजचे स्वादिष्ट मसाले
संपर्क : मच्छिंद्र कामंत, (सी.एम.डी), तिरूमला इंडस्ट्रियल इस्टेट, प्लॉट नं. ४, हिंजेवाडी, पुणे - ४११०२७ दूरध्वनी : ०२०-६५२९२४००
Email : dkamant@rediffmail.com, www.kamantmasale.com

# झक मारली अन् पुरस्कार दिला!

*मनोहरपंत* जोशी मुख्यमंत्री असताना त्यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना पहिला 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार देण्याचे ठरवले. याबाबत बाळासाहेबांना सांगताच ते म्हणाले, ''आपलेच सरकार असताना आपणच पुरस्कार घेणे योग्य नाही. महाराष्ट्रात या पुरस्काराच्या योग्यतेचे अनेकजण आहेत. पु. ल. देशपांडे हे आघाडीचे लेखक त्यासाठी मला पात्र वाटतात. हा पुरस्कार त्यामुळेच माझ्याऐवजी त्यांना देणे योग्य ठरेल.''

बाळासाहेबांच्या या निर्वाळ्यानंतर पाच लाख रूपये व पहिला 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार पुलंना देण्यात आला. पुरस्कार वितरण समारंभात बोलताना पुलंनी मात्र औचित्यभंग करत काही गोष्टी मांडल्या. शिवसेनेच्या सत्तेकडे बोट दाखवत त्यांनी 'ही लोकशाही नसून ठोकशाही आहे,' असे प्रतिपादन केले. पुरस्काराची रक्कम मात्र त्यांनी स्वीकारली. एखाद्या सुहृदयी माणसाने आपणास आग्रहाने जेवायला बोलवावे, पंचपक्वान्नाचा बेत आखावा आणि जेवायला येणाऱ्याने अन्नदात्यालाच दूषणे लावावीत, असा काहीसा प्रकार घडल्याने बाळासाहेबांच्या प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविकच होते. 'झक मारली अन् आम्ही पुरस्कार दिला' अशा खास ठाकरी शैलीत बाळासाहेबांनी त्यांचा समाचार घेतला.

ज्येष्ठ गायिका डॉ. प्रभा अत्रे यांना पुणे महानगरपालिकेने भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या स्मरणार्थ 'स्वरभास्कर' पुरस्कार जाहीर केला. तो वेळेत न दिला गेल्याने उलटसुलट प्रतिक्रिया उमटल्या आणि अत्रेंनी हा पुरस्कार नाकारला. यावरून पुणे महानगरपालिकेवर टीकेची झोड उठवली जात आहे. महापौर दत्तात्रय धनकवडे यांनी याबाबतचा खुलासा करताना अत्रे यांच्याशी झालेला पत्रव्यवहार माध्यमांच्या समोर आणला आहे. या पुरस्काराबाबत अत्रे यांनी अनेक अटी लादल्यानेच या कार्यक्रमाला उशीर होत असल्याचे सिद्ध झाले आहे. अत्रेबाई या ज्येष्ठ असल्या तरी बाळासाहेब ठाकरे यांचीच प्रतिक्रिया आज आम्हाला स्मरते.

हा पुरस्कार कुणाच्या हस्ते दिला जावा, कार्यक्रमाचे स्वरूप काय असावे, कार्यक्रमाच्यावेळी अत्रे यांच्या जीवनपटाची चित्रफीत दाखवली जावी, पुरस्काराव्यतिरिक्त त्यांच्या नावे चालू असलेल्या एका संस्थेस ७५ हजार रूपये देण्यात यावेत, अशा काही अटी त्यांनी घातलेल्या आहेत. प्रकाश जावडेकर, मनोहर पर्रीकर आणि माजी न्यायाधीश चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्याच हस्ते हा पुरस्कार द्यावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. पुरस्कार घेणाऱ्याने पुरस्कार देणाऱ्यांना अशा अटी घालण्याचे धाडस आश्चर्यकारक आहे. अत्रे यांच्याविषयी नितांत आदर असूनही त्यांच्या या हेकटपणाचे समर्थन करता येणार नाही.

एखादी व्यक्ती किंवा संस्था सर्वोच्च शिखरावर पोहोचल्यानंतरच तिची पुन्हा घसरण सुरू होते हा सृष्टीचा नियम आहे. भलेभले याला अपवाद ठरू शकले नाहीत. डॉ. प्रभा अत्रे यांच्याविषयी अनेकांच्या मनात आदरभावना असतानाच त्यांनी विक्षिप्तपणा दाखवून दिल्याने त्यांची घसरण सुरू झाली आहे. 'हा पुरस्कार वेळेत मिळावा म्हणून आपण सातत्याने पाठपुरावा करत होतो,' असे सांगणाऱ्या अत्रेबाई पुरस्कार आपल्या परवानगीशिवाय जाहीर केल्याचेही सांगतात. केवळ भाजप नेत्यांच्याच हस्ते पुरस्कार मिळावा अशी अपेक्षा व्यक्त करणाऱ्या अत्रेबाई अन्य कोणत्याही राजकीय नेत्याने मात्र या पुरस्कार वितरण सोहळ्यात व्यासपीठावर येऊ नये, हे ठासून सांगतात. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या ताब्यात असलेल्या पुणे महानगरपालिकेने हा पुरस्कार जाहीर केल्याने राष्ट्रवादीची कोंडी करणे, त्यांची प्रतिमा मलीन करणे या उद्देशाने तर हा सारा बनाव केला जात नाही ना? अशी शंका येण्यास त्यामुळेच मोठा वाव आहे. राज्यातील महत्त्वाची सांस्कृतिक नगरी असलेल्या पुणे महानगरपालिकेने अत्रे यांच्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्याचे



ठरवले आहे. असे असताना त्यांच्यावर अटी लादणे, आपणास हवे ते करवून घेणे यामागे अत्रे याच आहेत की अन्य कोणती विचारधारा सुप्तपणे त्यांची पाठराखण करतेय हेही तपासून घ्यायला हवे.

**संपादकीय**
घनश्याम पाटील ७०५७ २९२ ०९२

'मी पुण्याची नागरिक असून गेल्या ८३ वर्षात महापालिकेने मला कोणताही पुरस्कार दिला नाही,' अशी खंत व्यक्त करणाऱ्या प्रभा अत्रे पुणे महापालिकेचा अवमान करत आहेत. कोणताही कलाकार त्याच्या कलेला सर्वस्व मानतो. त्या त्या क्षेत्रातील दर्दींचा त्याला मिळणारा प्रतिसाद हाच त्याच्यासाठी मोठा पुरस्कार असतो. राजकीय आणि प्रशासकीय यंत्रणेकडून त्याने कौतुकाची अपेक्षा ठेवणे योग्य नाही. कलावंतांचा सन्मान करणे हा मात्र यंत्रणेचा धर्म असतो. पुणे महापालिका हा धर्म पार पाडत असताना अशी मुजोरी कोणीही करू नये.

लोककवी मनमोहन नातू म्हणायचे, 'उद्याचा कालीदास जर अनवाणी पायाने जात असेल तर त्यात अब्रू त्याची नाही राजा भोजाची जाते.' या प्रकरणात मात्र राजा भोज त्याचे कर्तव्य चोखपणे पार पाडत असताना कालीदास अकारण स्वत:ची आणि भोजाची अब्रू घालवत आहे. इतके सारे होऊनही पुण्याचे महापौर दत्तात्रय धनकवडे आणि उपमहापौर आबा बागुल यांनी सामंजस्याची भूमिका घेतली आहे. 'डॉ. प्रभा अत्रे यांची नाराजी दूर करू, त्यांच्या अटींचे शक्य तितके पालन करून त्यांचा जाहीर समारंभातून गौरव करू' असेच ते सभ्यपणे सांगत आहेत. ही सभ्यता अत्रे यांच्याकडून पायदळी तुडवली जात आहे. त्यांच्या वयाचा मान राखून, त्यांची कर्तबगारी लक्षात घेऊन आणि या पुरस्काराचे महत्त्व समजून पुणे महापालिका पडती भूमिका घेत असेल तर अत्रे यांनी अतिरेक करू नये. समस्त पुणेकरांचा हा एकप्रकारचा अवमानच आहे. कारण हे पुरस्कार शेवटी करदात्यांच्या खिशातूनच दिले जातात.

सध्या गल्लोगल्ली अनेक पुरस्कार दिले जात असताना पुरस्काराचे महत्त्व कमी कमी होत चालले आहे. एखादा पुरस्कार मिळाल्यानंतर गौरव वाटण्याऐवजी लोक त्याच्याकडे उपहासाने पाहतात. वशिलेबाजी, चमचेगिरी, हितसंबंध अशा प्रकारामुळे आपल्या मर्जीतल्या लोकांना पुरस्कार दिल्याने त्याची प्रतिष्ठा लयास जात आहे. एकाच व्यक्तिला, एकाच कामगिरीसाठी, एकाच संस्थेकडून सलग तेरा-तेरा वर्ष पुरस्कार मिळाल्याचे यापूर्वी आपण पाहिलेलेच आहे. अशा परिस्थितीत पुणे महापालिका डॉ. प्रभा अत्रे यांच्यासारख्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ गायिकेला पुरस्कार देत असेल तर अशा पुरस्कारांना पुन्हा एकदा प्रतिष्ठा प्राप्त होईल. पुरस्कार घेणाऱ्यांनी आपला संकुचितपणा आणि आत्मकेंद्रित प्रवृत्ती दाखवून देत 'पुरस्कार' या संकल्पनेचा 'कचरा' करू नये एवढीच या निमित्ताने माफक अपेक्षा व्यक्त करत आहोत.

❑

योगीराज परिवाराचे माऊली
श्री. ज्ञानेश्वरभाऊ तापकीर
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा







शुभेच्छुक
सचिन विधाते, सचिन हजारे, गिरीष डांगरे,
निलेश आंग्रे, निलेश आमले, अनय देशपांडे
विश्वास मुरकुटे
संचालक, मल्हार माची रिसॉर्ट
दत्तात्रय गंगणे
मुख्य व्यवस्थापक, योगीराज पतसंस्था

# गोपीनाथ मुंडे यांच्यामुळे तरलो!



उज्ज्वल निकम
विशेष सरकारी वकील
महाराष्ट्र राज्य

*ही* गोष्ट आहे १९९३ ची. जळगावमध्ये वकिली व्यवसायात नेकीने कार्यरत असल्याने वेगळी ओळख झाली होती. मुंबईतील बॉम्बस्फोटाने देश हादरला होता. त्या खटल्यात विशेष सरकारी वकील म्हणून माझी नियुक्ती झाली आणि मी मुंबई गाठली. मुंबईत ना कुणाच्या ओळखी ना या शहराची कसली माहिती. मात्र 'आपण भले आणि आपले काम भले' या न्यायाने मी येथे आलो. वकीलपत्र घेतले.

त्याचवेळी मला पोलीस आयुक्तांकडून सूचना आल्या की, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी भेटायला बोलावले आहे. मी त्यांच्याकडे गेलो. बाळासाहेबांनी अधिकाराने सांगितले की, ''निकम, या खटल्यातील आरोपी संजय दत्त याला आपल्याला सोडवायचे आहे.''

मी सांगितले, ''जमणार नाही. संजय दत्तला सोडायचे तर आणखी दहा-बारा गुन्हेगारांना सोडावे लागेल.''

तेव्हा तिथे उपस्थित असलेल्या एका शिवसैनिकाने मला दम भरला की, ''तुम्ही सरकारचे नोकर आहात. सरकार आमचे आहे आणि बाळासाहेब हेच सरकार आहेत. त्यांचा शब्द हा अंतिम असतो. तुम्हाला तसेच वागावे लागेल.''

मी म्हणालो, ''बाळासाहेब, चर्चा आपल्या दोघात ठरली होती. हा मला विचारणारा कोण?''

त्यांनी तो त्यांचा 'मानसपुत्र' जयंत जाधव असल्याचे सांगितले. ''हे काम माझ्याने होणार नाही'', असे मी स्पष्टपणे सांगताच त्यांनी त्यांच्या एका कार्यकर्त्याला 'पंतां'ना फोन करण्यास सांगितला. हे 'पंत' कोण हेही माझ्या तेव्हा लक्षात आले नाही. नंतरच्या संवादावरून कळले की राज्याचे तेव्हाचे मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना त्यांनी फोन लावला होता. या खटल्याचे कामकाज माझ्याकडून काढून घेण्याच्या सूचना त्यांनी माझ्या समोरच दिल्या.

मी 'मातोश्री'वरून बाहेर पडलो. बाहेर आल्याआल्या वायरलेसवरून सूचना मिळाल्या. मला तडक पोलीस आयुक्तांनी बोलावले. आमचा ताफा तिकडे गेला. त्यांनी मला सांगितले की, ''तुम्ही तुमचे सामान भरा. जळगावला जायची तयारी करा. मुख्यमंत्र्यांचे तसे आदेश आहेत.''

मी निघण्याच्या तयारीत होतो तोच पोलीस आयुक्तांना तेव्हाचे गृहमंत्री गोपीनाथ मुंडे यांचा फोन आला. त्यांना मी ओळखतही नव्हतो. त्यांनी सांगितले की, ''उज्ज्वल निकम यांची मी सगळी माहिती काढली आहे. ते प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ वकील आहेत. कोणत्याही परिस्थितीत त्यांना परत जाऊ देऊ नका...''

पोलीस आयुक्तांनी मी त्यांच्यासमोरच बसलो असल्याचे सांगितले. त्याबरोबर मुंडे यांनी आम्हाला दोघांनाही तिकडे बोलावले.

आम्ही त्यांच्याकडे गेलो. माझे वकीलपत्र रद्द करण्याचा निर्णय खुद्द मुख्यमंत्र्यांनीच घेतला होता. त्यामुळे मुंडेंनी जोशींना फोन करून विचारणा केली. हा आदेश 'मातोश्री'चा असल्याचे त्यांना सांगण्यात आले. 'गृहखाते तुमच्याकडे आहे. कसे ते तुम्ही ठरवा पण निकमांना जळगावला परत पाठवा' असे जोशींनी त्यांना सांगितले.

त्याबरोबर गोपीनाथ मुंडे यांनी माझ्या देखत बाळासाहेबांना फोन केला. ते म्हणाले, ''साहेब, उज्ज्वलची सर्व माहिती मी काढली आहे. हा प्रामाणिक माणूस आहे. गृहखात्याची प्रतिमा डागाळू नये यासाठी अशाच खमक्या आणि निःस्वार्थ वकीलाची गरज आहे.''

बाळासाहेब त्यांना म्हणाले, ''तो शरद पवारांचा माणूस आहे...''

मुंडेंनी त्यांना ठासून सांगितले, ''साहेब, मी यांची खात्री देतो. ते फक्त प्रामाणिकपणाची वकिली करतील. पवारांचा आणि त्यांचा काहीही संबंध नाही. गृहखाते माझ्याकडे आहे. मला काही निर्णय घ्यायचे तरी स्वातंत्र्य द्या!''

बाळासाहेबांनी फोन आपटला.

माझी आणि गोपीनाथ मुंडे यांची ही पहिलीच भेट होती. यापूर्वी आम्ही कधी फोनवरही बोललो नव्हतो. मात्र माझी सगळी कुंडलीच त्यांनी काढली होती. माझ्यासाठी त्यांनी बाळासाहेबांकडे आपला शब्द टाकला. टोकाची भूमिका घेत माझी पाठराखण केली.





तेव्हा खरेतर माझी आणि शरद पवार यांचीही ओळख नव्हती. तोपर्यंत त्यांच्याशी माझा कसलाही संपर्क आला नव्हता. त्यांच्याच मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीत माझ्याकडे सरकारी वकील म्हणून महत्त्वाचे खटले आले होते. मात्र मुख्यमंत्र्यांशी थेट संपर्क येण्याचे काहीच कारण नव्हते.

सुनील दत्त यांनी साकडे घातल्याने बाळासाहेब संजयची पाठराखण करत होते, पण खटल्याचे काम सुरू झाल्यावर त्यांनी त्यात कधीही हस्तक्षेप केला नाही. उलट त्यांना स्पष्ट शब्दात नकार दिल्याने त्यांनी मला पुन्हा भेटायला बोलवून घेतले. माझे कौतुक केले. आमची पुढे चांगली गट्टी जमली. विविध विषयांवर ते मोकळेपणाने बोलायचे. त्यांच्यात एखाद्या लहान मुलासारखा निरागसपणा होता. माझ्या छोट्या छोट्या गोष्टींचेही त्यांना कौतुक वाटायचे.

त्यावेळी गोपीनाथ मुंडे यांनी तटस्थपणे माझी पाठराखण केली नसती तर मला मुंबई सोडावी लागली असती. मी जळगाव सारख्या 'गावातून' मुंबईत गेलो होतो. मुंबईची संस्कृती मला माहीत नव्हती. न्याय व्यवस्थेची पूजा बांधताना मी कधीच कोणापुढे लाचार झालो नाही. सद्‌विवेक सोडला नाही. मी फार काही वेगळे करतोय असेही मला कधी वाटले नाही. जे केले तो माझ्या कामाचाच एक भाग आहे. मात्र त्यावेळी गोपीनाथ मुंडे यांनी स्वतःहून पुढाकार घेतला नसता तर कदाचित आजचा उज्ज्वल निकम दिसला नसता.

मुंबई बॉम्बस्फोट, गुलशनकुमार हत्या प्रकरण, प्रमोद महाजन खून खटला, कसाबची फाशी अशा अनेक प्रकरणात सरकारी वकील म्हणून मला काम पाहता आले. या व अशा सर्व महत्त्वाच्या प्रकरणात मी स्वतःशी प्रामाणिक राहिलो. लोकांच्या मनात विश्वास निर्माण झाला. मात्र मुंडे साहेबांनी त्यावेळी बाळासाहेबांना समजावून सांगितले नसते तर मी जळगावपुरताच मर्यादित राहिलो असतो. फक्त विद्वत्ता असून चालत नाही, तर ती सिद्ध करण्याची संधी मिळावी लागते. गोपीनाथ मुंडे यांच्यासारख्या कार्यतत्पर, प्रामाणिक आणि तटस्थ वृत्तीच्या नेत्यामुळे ही संधी मला मिळाली.

या नेत्याचे अपघाती निधन सर्वांनाच चटका लावणारे आहे. बिनधास्त बोलणारी एक धडधडती तोफ अकाली थंडावली आहे. मैत्रीला आणि दिल्या शब्दाला जागणारा हा नेता सामान्यांच्या हितासाठी लढला. त्यांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त (३ जून) माझ्यातर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली. ❑

---

# निरागसता

ज्योती देशमुख-महाजन
कुडवळे, दापोली, रत्नागिरी. ८००७८३५७९७

*मी* मनाली, ६ वर्षाची छोटीशी मुलगी. खेळ, खेळणी, मित्र-मैत्रिणी, खाऊ, बाग, आई-बाबा, आजी-आजोबा हे माझे विश्व. आता जून पासून मी शाळेत जाणार आहे. तेथे मला अजून खूप मित्र-मैत्रिणी मिळतील का? माझ्यासारखे निरागस?

सगळेच म्हणतात मी खूप निरागस आहे. पण निरागस असणे म्हणजे काय? सुंदर आहे हे आरशात पाहून दिसतं! उंच आहे, गोरी आहे हे पण आरशात पाहून दिसतं पण आई-बाबा, आजी-आजोबा, शेजारी, सगळे नातेवाईक कायमच म्हणतात की मी निरागस आहे? मग मी एकदा आजीला विचारले, आजी 'निरागस' म्हणजे काय? ते कोठे आणि कसे दिसणार, की मी निरागस आहे? आजीने थोडावेळ विचार केला आणि मला जवळ घेत म्हणाली, ''बाळा तुझ्या वागण्यात, बोलण्यात, कृतीत दुसऱ्याला त्रास किंवा दुःख देण्याचा प्रयत्न नसतो. तू जे बोलतेस, वागतेस ते खूपच सहज, स्पष्ट आणि मनापासून असतं, कळलं का मनू.'' असे म्हणत आजीने एक गोड पापा घेतला आणि मी खेळायला पळाले. पण तो विषय माझ्या मनातून गेला नव्हता. रात्री झोपायला गेले तरी आजीचे ते वाक्य डोक्यात आलेच.

सगळे लोक मला व माझ्या मित्र-मैत्रिणींनाच निरागस म्हणतात. पण मोठ्या माणसांना निरागस का म्हणत नाहीत. मोठी माणसे आमच्यासारखी वागत नाहीत म्हणून त्यांना निरागस म्हणत नाहीत का? पण ती तशी का वागत नाहीत? मी तर निरागसता कोठेही हे शिकले नाहीच, पण माझे मित्र-मैत्रिणीही कोठे शिकले नाहीत. मोठी माणसे म्हणजे आई-बाबा, आजी-आजोबा वगैरे तर खूप मोठे आहेत. शिकलेले आहेत. शाळेतपण गेलेले आहेत. मग तरीही ते निरागस का नाहीत? ते तसे झाले तर लोक त्यांचेही कौतुक करतील ना? ते सगळ्यांना आवडतील. मी उद्या आजीला हेच विचारणार.

आजीने काल दिलेले उत्तर आठवत मी तिला विचारले. ''आजी तुम्ही मोठी माणसं मनापासून आणि सहज का नाही वागत. दुसऱ्याला दुःख होईल असे का वागता आणि बोलता?'' आजीकडे माझ्या प्रश्नाचे उत्तर नव्हते. पण तरीही आजी म्हणाली, ''मनू मोठ्या माणसांना तसे वागता नाही येत बाळा. तू मोठी झालीस ना, की तुला कळेल मनू, मोठ्या माणसांचे वेगळे असते सगळे. आता पळ खेळायला.''

मी खेळायला गेले पण माझा प्रश्न आजीला विचार करायला लावणारा होता. त्यामुळे, माणसांमधले राग, द्वेष, लोभ, टोमणे, असूया या सर्व गोष्टी आजीच्या मनात आल्या असाव्यात. खरंच, आपण मोठी माणसे असं का वागतो? असा विचार आजी करू लागली. आम्ही पण मनूच्या वयाचे होतो की कधीतरी, मग बदल केव्हा, कसा आणि का झाला?

आजीने दिलेल्या उत्तराने माझे समाधान झालेले नव्हते. मी मोठी झाल्यावर मला समजेल असे आजी का म्हणाली? पण कोणतीच मोठी माणसे निरागस नाहीत तर मग, मोठी झाल्यावर मी पण निरागस नसणार का? मोठ्या माणसांना निरागसपणे का वागता येत नसेल? दुसऱ्याला दुःख देऊ नये असे आजी-आजोबा, आई-बाबा कायम सांगतात. मग ही सगळी मोठी माणसे अशी का वागतात? जे आम्हाला सांगतात ते स्वतः का नाही करत? वेगळे काय असते मोठ्या माणसांचे?

या विचारात मला झोप लागली. मात्र मला माझ्या कोणत्याच प्रश्नांची उत्तरे मिळाली नाहीत, कारण मी मोठी नव्हते... मी 'निरागस' होते. ❑





# जगणे समृद्ध करणारे भाऊ

दत्तात्रय गंगणे
मुख्य व्यवस्थापक,
योगीराज ना.सह. पतसंस्था,बाणेर, पुणे.
संपर्क : ९४२२३ ४५६९४

**बाणेर, बालेवाडी भागाचा समावेश पुणे महानगरपालिकेत झाला आणि ज्ञानेश्वरभाऊ तापकीर हे या परिसराचे पहिले नगरसेवक झाले. पुणे महानगरपालिकेत कर्मचारी म्हणून कार्यरत असलेले भाऊ पुण्याचे नगरसेवक झाले. सर्वसामान्य माणसाच्या सुखदुःखाची त्यांना जाणीव असल्याने त्यांनी त्यांच्या भल्यासाठी अनेक योजना राबविल्या. वीस वर्षापूर्वी त्यांनी स्थापन केलेल्या 'योगीराज नागरी सहकारी पतसंस्थे'ने सहकार क्षेत्रात भरीव योगदान दिले. 'माऊली' हे नाव सार्थ ठरविणाऱ्या भाऊंनी जे कार्य उभे केले आहे ते विस्मयकारक आहे. ४ जून हा त्यांचा जन्मदिन. त्यानिमित्त....!**

*सर्वत्र* सहकाराचा स्वाहाकार होत असताना महाराष्ट्रात मात्र काही तत्त्वनिष्ठ, ध्येयवादी आणि प्रामाणिक नेत्यांनी सहकार चळवळ जिवंत ठेवली. पतसंस्था फेडरेशनचे संचालक आणि योगीराज नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वरभाऊ तापकीर हे त्यापैकीच एक. बाणेर, बालेवाडीच्या विकासासाठी म्हणून त्यांनी 'योगीराज'ची स्थापना केली. 'इवलेसे रोप लावियेले द्वारी, तयाचा वेलू गेला गगनावरी' अशी काहीसी आमच्या संस्थेची अवस्था झाली. फक्त बाणेर, बालेवाडी, औंध, पाषाण, बावधन, पिंपरी-चिंचवड इतकाच परिसर नव्हे तर दुबई आणि सिंगापूरपर्यंत योगीराज नागरी सहकारी पतसंस्थेचे कर्जदार आणि ठेवीदार पसरले आहेत.

'संपत्ती, संस्कृती संवर्धनारी संस्था' अशी योगीराजची ओळख झाली आहे. पतसंस्थेच्या माध्यमातून स्वार्थ न साधता स्वअर्थ शोधल्याने योगीराजच्या कीर्तिचा दरवळ सर्वत्र पसरला आहे. अपघातात डोक्याची कवटी फुटल्यानंतर उपचारासाठी त्याला तातडीने कर्ज उपलब्ध करून देणारी, माणुसकी जिवंत ठेवणारी 'योगीराज'सारखी संस्था एकमेवाद्वितीय असावी. मेंढ्याच्या कळपाचे नेतृत्व वनराज सिंह करत असेल तर मेंढ्याही सिंहाप्रमाणे शौर्य दाखवतात. तापकीर भाऊंनी सामान्य माणसाला शक्ती देत, त्याचे हात बळकट करत, त्याला सर्वतोपरी सहाय्य करत जगण्याची दिशा दाखवली. 'केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे' हा मूलमंत्र तापकीर भाऊंनी आम्हा सर्वांना दिल्याने या पतसंस्थेचा वटवृक्षाप्रमाणे विस्तार झाला आहे. थोडी थोडकी नव्हे तर तब्बल साडे तीनशे कोटींच्या उलाढालीचा टप्पा योगीराजने गाठला आहे. यासर्वामागे ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांच्यासारख्या हरहुन्नरी आणि दिलदार नेतृत्वाचा वाटा सर्वाधिक आहे.

ही संस्था केवळ अर्थकारणापुरती मर्यादित राहिली नाही. अत्यंत दूरदृष्टिने भाऊंनी समाजाच्या सर्वक्षेत्रात भरीव योगदान दिले. बाणेर उपनगरीय साहित्य संमेलनाच्या माध्यमातून त्यांनी या परिसरातील लोकांना साहित्याचा लळा लावला. साहित्यिक आणि कलाकारांना बाणेरमध्ये आणून वाचकांशी त्यांचा थेट संवाद साधून दिला. 'योगीराज भूषण' पुरस्काराची सुरुवात केली. ज्येष्ठ समाजसेवक प्रकाशभाऊ आणि मंदाताई आमटे यांना तेरा लाख रूपये आणि रूग्णवाहिका दिली. भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील त्यांचे पती देविसिंग शेखावत यांच्यासह या सोहळ्यास आवर्जून उपस्थित राहिल्या. अनाथांची माय असलेल्या सिंधूताई सपकाळ यांनाही भाऊंनी वेळोवेळी सहकार्याचा हात दिला.

कोणाचे भाऊ तर कोणाचे माऊली झालेले आमचे ज्ञानेश्वरभाऊ तापकीर नेहमी श्रमाला किंमत देतात. ते स्वत: काळ्या आईची सेवा करत शेतीत राबतात. विविध पिकांबरोबरच स्ट्रॉबेरीचे उत्पन्न घेतात. सर्व मित्रांना ही स्ट्रॉबेरी घरपोच भेट म्हणून पाठवतात. दिवाळीसारख्या सणात, पतसंस्थेच्या वर्धापनदिनी, अन्य सांस्कृतिक कार्यक्रमात प्रभागातील ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, कलाकार, गुणवंत कर्मचारी आदींचा यथायोग्य गौरव करतात. आवश्यक त्यांना आर्थिक सहकार्याचा हात देतात.

पतसंस्थेतील सर्व कर्मचाऱ्यावर ते पितृतुल्य प्रेम करतात. प्रत्येकांच्या वैयक्तिक अडीअडचणीत पाठिशी राहतात. गगनगिरी महाराजांचे भक्त असल्याने त्यांच्यात गर्वाचा लवलेश नाही. संस्थेत येणाऱ्या प्रत्येकाचे स्वागत उत्साहात केले जाते. या संस्थेच्या स्थापनेवेळी खुद्द गगनगिरी महाराज या वास्तूत आले होते, यापेक्षा मोठे भाग्य ते कोणते?

सामाजिक, राजकीय, सहकार, कृषी अशा सर्व क्षेत्रात दखलपात्र योगदान देणारे भाऊ साहित्याची विशेष आवड जोपासतात. 'चपराक'सारख्या दर्जेदार नियतकालिकाचे ते सल्लागार आहेत. या परिसरात 'चपराक'चे वाचक वाढावेत यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. 'चपराक प्रकाशन'ची अनेक वाचनीय आणि दर्जेदार पुस्तके विकत घेऊन त्यांनी आमच्या मान्यवर सभासदांना भेट दिली. वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी त्यांच्याकडून उत्फूर्तपणे सुरू असलेले हे कार्य आदर्शवत आहे.

मराठवाड्यासारख्या दुष्काळी भागातून पुण्यात आल्यानंतर मी त्यांच्या सहवासात आलो. योगीराज नागरी सहकारी पतसंस्थेचा व्यवस्थापक म्हणून त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मला मिळाली. माझ्या जडणघडणीत भाऊंचा वाटा मोठा आहे. माझ्यासारख्या अनेकांना योग्य दिशा दाखवून आमचे जगणे समृद्ध करणाऱ्या भाऊंना जन्मदिनानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा देतो. गगनगिरी महाराजांकडून त्यांना लाभलेले आशीर्वाद आमचे जगणे सुसह्य करतात. भाऊंच्या रूपाने त्या आशीर्वादाचे फळ आम्हाला चाखायला मिळते याचे मोठे समाधान वाटते.

भाऊ, तुमच्या यशाची पताका सर्वत्र डौलात फडकत राहील, याबाबत माझ्या मनात तिळमात्र शंका नाही.

❑

# गोठलेला ज्वालामुखी

*रसिकाचा* पुण्यातून फोन आला की मी अधिक जागृत होतो. मनातला विद्रोह, असंतोष वाहू लागतो. आणखी नवे विषय काय मिळतील. ते पाहू लागतो. पण मग वाटते आपली तरूणपिढी कितपत जागी झाली आहे? ती सजग आहे का? राजकीय हेतू असलेले, राजकारण्यांनी सांगितलेले आंदोलन वेगळे आणि मला वाटते, मला पटते, माझ्या मनात या ठिणग्या मावत नाहीत. अशा जळजळी भावनेने केलेले परिवर्तनाचे कार्य निराळे.

'जरा 'समाजस्वास्थ्य' मासिक काढून लैंगिक शिक्षण, कुटुंबनियोजन, लोकसंख्या नियंत्रण यांचा प्रचार, प्रसार करा हो' असे रघुनाथराव कर्वे ह्यांना कुणी आदेश दिले नव्हते. कर्व्यांनी ते अंत:करणापासून केले. छळ सोसला. नोकरी सोडली.

मला तरूण पिढी फारच उदास, निष्क्रिय, स्वार्थी वाटते. कदाचित म्हणूनच आत्तापर्यंत या देशाने शत्रूशी युद्ध सुरू केले नव्हते. पोरे कॉलेजात येतात. मस्ती-मस्करी, शिक्षकांची टवाळी, अरे तुरे करत घरी जातात. मोबाइलवरून फक्त प्रेमाच्या, सेक्सच्या, पटवापटवीच्या वार्ता चालतात. ही 'चालू' आहे, ती बाई नांदत नाही, एकटी असते. असल्या गप्पा! हे काय जीवन आहे? हे विडंबन आहे.

ही युवाशक्ती चांगल्या कार्यासाठी पुढारलेल्या विचारांसाठी कधी पुढे येताना, साखळी बांधताना मला कोकणात दिसली नाही. शहरात पुण्यात वेगळे चित्र असेल तर आनंद आहे. कायदे, नियम गुंडाळून ठेवणे तर महाराष्ट्रात सर्रास चालते.

मनात विस्तव मावेना तेव्हा भगतसिंह सारखे स्फोटक विचारांचे नास्तिक क्रांतिवीर स्वराज्याच्या चळवळीत उतरले. त्यामुळे इग्रजांचा तोरा आणि चेहराही 'उतरला' असणार. हे 'तेज' मला कुठे दिसत नाही. स्कॉलर पोरगा कॅमेरासमोर येतो, मुलाखत देतो. पण तो नंतर दोस्तांसाठी, समाजासाठी काय करतो? पुढच्या मोठ्या स्पर्धेत टिकतो का? स्वत:चा चिमणाचिमणीचा प्रपंच तेवढा करतो.

देशासाठी पूर्णवेळ समाजकार्य कोण करतो? आगाऊपणा करणारी जी ओव्हरस्मार्ट मुले 'मीडिया आपणच सांभाळतो' अशा भ्रमात मला दिसली. त्यांना चार ओळी शुद्ध लिहता येत नाहीत की रोजच्या जीवनात अंधविश्वास आणि दैववाद टाळता येत नाही. या पिढीची 'नेट'वाली आधुनिकता वरवरची आहे. मनातून ही पिढी जातीयवादी व अंधश्रद्धाळूच आहे. म्हणूनच महाराष्ट्राला नीट दिशा मिळालेली नाही.

जेव्हा अन्यायाच्या, भ्रष्टाचाराच्या, बुवाबाजीच्या विरोधात युवाशक्ती जागी होईल तेव्हाच दुर्जनांना पळता भूई थोडी होईल. आज मात्र सज्जनच जास्त त्रास सोसत आहेत.

■ **माधव गवाणकर** दापोली (रत्नागिरी), ९१४५९२४०५३



# देवाचा नवस

प्लिज देवा, मला, नोकरी मिळू दे. पहिल्या पगारातील ५ टक्के वाटा तुला अर्पण करेल. प्लिज देवा! त्यानं देवापुढे हात जोडून देवापुढं प्रार्थना करत देवाशी व्यवहारही ठरवून टाकला. फक्त त्याचं नाव नवस असं ठेवलं. मुलाखत चांगली झाली होती. तसा तो हुशारही होता. पण घरची परिस्थिती हलाखीची होती. कॉलेज संपून महिनाही उलटला नव्हता. निकालाची वाट पाहण्यापेक्षा त्याला चांगली नोकरी शोधणं जास्त गरजेचं होतं. कॉलेजच्या कोणत्यातरी योजनेद्वारे तो नोकरी करतच शिकला होता. मात्र कॉलेज संपल्यानं नोकरी संपली. शिक्षण संपलं. आता पूर्णवेळ नोकरीतच तो पूर्ण आयुष्य घालणार होता. खिसा रिकामाच असल्याने दररोज एका एका मित्राच्या खोलीवर राहून कसेबसे दिवस काढत होता. यातच बाप अजूनही घरखर्चासाठी काही मागत नाही, यामुळं समाधान मानत होता.

काही दिवसांनी त्याला हवी असलेली अन् देवाकडे मागितलेली नोकरी त्याला मिळाली. त्याच्या आनंदाला आकाश कमी पडले. नोकरीमुळे याचा आत्मविश्वासही उंचावला होता. ठरल्याप्रमाणे तो नोकरीला रूजूही झाला. पहिल्या पगाराच्या भरवशावर अनेकांना आश्वासनं देत कसा बसा महिनाही भरला. पहिल्या पगाराचा दिवसही उजाडला. ठरल्याप्रमाणं पगारही मिळाला. सगळ्यात पहिल्यांदा त्यानं देवाचा नवस पूर्ण करण्याचं ठरवलं. कामाचा दिवस असल्यानं आज देवळात फार गर्दी नव्हती. पहिल्या पगारातील ठरलेली रक्कम घेऊन तो देवाला नमस्कार करून दानपेटीजवळ आला. दानपेटी खिडकीजवळ होती. सहजच त्याची नजर खिडकीतून बाहेर गेली.

दुर्धर आजारानं कुरूप झालेला एक मनुष्य दोन्ही हातांनी मंदिरातील भक्तांना मदतीची याचना करत होता. देवळातील माणसं देवाकडं पाहत होती. अन् देवळाबाहेरील याचक माणसांकडं पाहत होता. देवळातील देवासह सर्वांनाच याचकाचे हात दिसत होते. पण कोणाचेही पाय याचकाकडे वळत नव्हते. अर्थात याचकाचा अन् देवळातील लोकांचा तो नित्यक्रमच होता. दानपेटीजवळ पैसे हातात घेऊन उभ्या असलेल्या यानं एकदा देवाकडं पाहिलं. एकदा याचकाकडं पाहिलं. देव निश्चल होता. याचक चलबिचल करत होता. देव काहीच मागत नव्हता. याचक काहीतरी मागत होता. पण देवाला खूपकाही मिळत होते. याचकाला फार काही मिळत नव्हते. याने देवाला नमस्कार केला. खिडकीबाहेरील याचकाजवळ गेला. याचकाच्या हातात पैसे ठेवले. याचकाच्या चेहऱ्यावर आनंद पसरला. त्याच आनंदाचे याच्याही चेहऱ्यावर प्रतिबिंब उमटले. तशाच अवस्थेत सांगता न येणार समाधान घेऊन तो देवळाबाहेर पडला. पण त्याला नवस फिटला का नाही हे मात्र काही केल्या समजत नव्हतं.

■ **व्यंकटेश कल्याणकर**, पुणे
भ्रमणध्वनी ९४०४२ ५१७५१

# 'उपयुक्त उत्पादने निर्माण केल्यास 'अच्छे दिन' येतील'

## प्रमोदकुमार बेलसरे यांना 'जीवनगौरव' पुरस्कार



**कोल्हापूर, (प्रतिनिधी) :** साखर कारखानदारांनी केवळ साखर उत्पादनावर अवलंबून न राहता ग्राहकांना उपयुक्त अशी उत्पादने निर्माण केल्यास या क्षेत्रात अच्छे दिन येतील, असा विश्वास सुप्रसिद्ध उद्योजक आणि इंडियाना सुक्रोटेक पुणे प्रा. लि. चे प्रमुख प्रमोदकुमार बेलसरे यांनी व्यक्त केला.

भारतीय शुगर संस्थेच्या वतीने प्रमोदकुमार बेलसरे यांना 'जीवनगौरव पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. यावेळी सत्काराला उत्तर देताना बेलसरे बोलत होते. यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक आणि वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंटचे संचालक संजीव पटजोशी अध्यक्षस्थानी होते. श्री. बेलसरे यांच्यासोबतच कर्नाटकचे माजी उद्योगमंत्री आणि निराणी शुगर इंडस्ट्रिजचे अध्यक्ष मुरुगेश निराणी यांनाही जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पुढे बोलताना प्रमोदकुमार बेलसरे म्हणाले, देशातील साखर कारखानदारी ही मागणी आणि पुरवठ्याच्या चक्रात अडकली आहे. केंद्र सरकारकडून साखर कारखानदारीसंदर्भात निश्चित असे धोरण ठरवले जात नाही. देशातील साखर कारखानदारांनी एकत्र आल्यास त्यातून काहीतरी साध्य करता येईल.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दूधगंगा कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमित कोरे होते. भारतीय शुगर संस्थेचे विक्रमसिंह शिंदे, पी.एम. रासकर, एम. एस. सुंदरम, संग्रामसिंह शिंदे आदींचीही प्रमुख उपस्थिती होती. शशिकांत दळवी यांनी प्रास्ताविक केले.




**अशोक जाधव**, सहा. विक्रीकर आयुक्त (नि.), महालक्ष्मी, मुंबई भ्रमणध्वनी : ९८१९६२६६४८

*मागच्याच* आठवड्यात वर्तमानपत्रात ''आर्यभूषण' छापखाना संपवण्याचा घाट' अशी बातमी वाचली. हा आर्यभूषण छापखाना पुणे येथे नामदार गोपाळकृष्ण गोखले यांनी सुरू केला होता व तेथे मराठीतील पहिले दैनिक 'ज्ञानप्रकाश' हे छापले जात असे. याशिवाय राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे मुखपत्र 'हरिजन' देखील छापले जात असे. मात्र आता हा छापखाना विक्रीला काढला असल्याचा आरोप गोखले यांचे पणतू ॲड. सुनील गोखले यांनी केला आहे. सध्या हा छापखाना संचालक मंडळ चालवत असून त्यांनीच तो विक्रीला काढला असल्याचेही त्यांचे म्हणणे आहे.

वास्तविक पाहता 'आर्यभूषण' छापखान्याला व त्याच्या इमारतीला ऐतिहासिक वारसाचा दर्जा मिळालेला आहे. त्यामुळे या प्रकरणाला महत्त्व प्राप्त झाले आहे. संचालक मंडळाने मात्र हा छापखाना विक्रीला काढल्याचे वृत्त निराधार असल्याचे सांगितले आहे. कलियुगात कधी काय घडेल हे सांगता येत नाही. त्यामुळे या बातमीचे महत्त्व लक्षात येऊनही आपण काहीच करू शकत नाही, हे सरळ आहे.

गेले कित्येक महिने कोल्हापुरचा असाच एक ऐतिहासिक सिनेमा स्टुडिओ बिल्डरच्या घशात घालण्याचा डाव आखला जात असल्याचं समोर आलं होतं. मात्र पुढे त्या बातमीची पाठपुरावा वाचायला वा पाहायला मिळाला नाही. सध्या ऐतिहासिक वारसा लाभलेल्या वास्तू लिलावात काढायची एक टूमच निघाली आहे. नाहीतरी ऐतिहासिक वारसा म्हणजे काय? तर आपल्या पणजोबा-अजोबांनी विकत घेतलेली वा निर्माण केलेली वस्तू किंवा फारतर अजोबांनी विकलेली आणि नातवाने 'अँटीक पीस' म्हणून पुन्हा विकत घेतलेली गोष्ट असाच काहीसा त्याचा अर्थ होऊन बसला आहे. यातला विनोदाचा भाग सोडला तरी ''जुने जाऊद्या मरणा लागुनी, नव्याचे स्वागत करा,'' असेही बोलले जाते.

नश्वर मानवी शरीर जीर्ण झाल्यावर संपतेच परंतु काही काळ याच नश्वर देहाने असमान्य अशी कामगिरी करून ठेवलेली असते. ती पुढच्या पिढ्यांनादेखील जमत नाही. मात्र पुढच्या पिढीला प्रेरणादायी ठरत असते. महात्मा गांधींच्या 'हरिजन'चा छापखान्याला आता ऐतिहासिक वारसा म्हणून कोणी मानत नसेल परंतु त्याची ऐहिक व बाजारभावाची किंमत करोडोच्या घरात गेली आहे. त्यामुळेच असे घाट घातले जात असावेत. महात्माजींच्या 'हरिजन'ला किंमत नाही. महात्माजींचे विचार आजा कोणालाही नको आहेत, मात्र महत्माजींचा फोटो असलेला कागद (नोट) मात्र सर्वानाच हवाहवासा वाटतो.

आमचे वडील सांगायचे की, आमच्या काळात दहा रूपयांची नोट म्हणजे बैलगाडीच्या चाकाएवढी व शंभराची नोट आकाशाऐवढी वाटत असे. आज महात्माजींचा फोटो असलेल्या पाचशेच्या नोटेला बाजारात किती किंमत आहे? हे आपण जाणताच परंतु त्यापेक्षा जास्त किंमत छापखान्याच्या जागेला आहे. त्यामुळे महात्माजींचा फोटो असलेल्या भरपूर नोटा त्यांना मिळणार असतील म्हणूनच ही सर्व उठाठेव सुरू आहे. मुंबईचे दादरमधील शिवाजी पार्कही ऐतिहासिक वारसाच्या यादीत घालण्याचा घाट मध्यंतरी चालला होता. त्याविषयी वर्तमानपत्रात रोज उलट-सुलट बातम्या येत होत्या. काही राजकीय पक्षांना त्रास व्हावा म्हणून शिवाजी पार्क ऐतिहासिक वारसांच्या यादीत समावेश करणार असल्याचाही विचार असल्याचीही चर्चा होती. त्यानंतर झालेही तसेच. शिवाजी पार्क ऐतिहासिक वारसा म्हणून जाहीर करण्यात आले.

आजच्या घडीला महाराष्ट्रात कितीतरी ऐतिहासिक स्थळं आहेत. त्यातील एखादे ठिकाण विकून तेथे मोठा मॉल झाला तर काय बिघडले? असाही कोणी विचार करत असतील. मात्र ज्या छापखान्याने मराठीतले 'ज्ञानप्रकाश' हे पहिले वहिले दैनिक छापले त्यावर गदा यावी हे दुर्दैव आहे. आज महाराष्ट्रातून शेकडो दैनिकं प्रकाशित होतात. त्यांचे मूळ कापायचा प्रयत्न झाला तर जी दैनिके समाजमन जागृत करून ते घडविण्याचे काम करतात. तर ते मूळ कापण्यासाठी त्यांच्या डोक्यात 'ज्ञानप्रकाश' पडावा अशीच सर्वांनी प्रार्थना केली पाहिजे. ❑

# योगीराज पतसंस्थेकडून गगनगिरी मठाला पाच लाखाची मदत



**पुणे, (प्रतिनिधी)** : नेहमीच विधायक उपक्रम राबविणाऱ्या योगीराज नागरी सहकारी पतसंस्थेचा १९ वा वर्धापनदिन नुकताच उत्साहात पार पडला. वर्धापन दिनानिमित्त योगीराज पतसंस्थेच्या वतीने गगनगिरी महाराज यांच्या खोपोलीतील मठाला सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी जनरेटर व्हॅन खरेदीसाठी पाच लाख रूपयांची आर्थिक मदत करण्यात आली.

योगीराज पतसंस्थेने चालू वर्षात २ कोटी ५२ लाख रूपयांचा नफा मिळविला आहे. याशिवाय एकूण वाटप कर्जापैकी ९८ टक्के कर्जाची वसुली झाली असून पतसंस्थेच्या ६० कोटींच्या ठेवी असल्याची माहिती योगीराजचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर तापकीर यांनी दिली.

यावेळी औंध प्रभाग समितीचे नवनिर्वाचित स्विकृत सदस्य बाळासाहेब रानवडे, बाळासाहेब सुतार, अभिजीत केदारी यांचा पतसंस्थेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

महापौर दत्तात्रेय धनकवडे, नगरसेवक बाबूराव चांदेरे, कैलास गायकवाड, नगरसेविका रंजना मुरकुटे, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सविता दगडे, शहाजीराव रानवडे, रवींद्र घाटे, राजाभाऊ जोरी, फुलचंद बांठीया, गणपतशेठ मुरकुटे, नवनाथ अनपट, गणेश बाफना, अर्जुनराव विधाते, अशोकराव मुरकुटे, अर्जुन शिंदे, रतनशेठ बालवडकर, उमेश वाणी, गजानन ताम्हाणे, बबनराव चाकणकर, संतोष करपटे, भगवानराव पठारे, महेंद्र यादव, कविता नावंदे, दत्तात्रेय तापकीर यांसह संस्थेचे खातेदार, ठेवीदार, बँकेचे प्रतिनिधी, हितचिंतक यावेळी उपस्थित होते.

**नेत्रदान करा!**



**भारताची लोकसंख्या** : ११८ कोटी
**रोज मृत पावणाऱ्यांची संख्या** : ६२,३८९
**रोज जन्म घेणाऱ्यांची संख्या** : ८६,८५३
**भारतातील अंध लोकांची संख्या** : ६,८२,४९७

**तुमच्या डोळ्यांचे दान करून इतर गरजूंना ही सृष्टी पाहण्याची संधी द्या!**

**विजयकुमार मर्लेचा**, विश्वस्त सुकांता चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी वेद प्रिंटर्स, ५१८, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० येथे छापून शॉप नं. १, श्री दुर्वांकुर हौसिंग सोसायटी, १६१, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक घनश्याम वसंतराव पाटील** (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वादविवाद पुणे न्यायालयीन कक्षेत)

संपादकीय कार्यालय: 'चपराक', ६१७, साईकृपा, पहिला मजला, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११००२ भ्रमणध्वनी: ७०५७२९२०९२ ई-मेल: info@chaprak.com